नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 04/04/2023 (मंगळवार) सकाळ

# बुटीबोरी येथे अंमली पदार्थाची वाहतुक करणाऱ्यांस केले जेरबंद

## (स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणची कारवाई)

दि. ०३/०४/२०२३ रोजी बुटीबोरी परीसरात स्थानीक गुन्हे शाखा चे पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदाराने खात्रीशीर खबर दिली कि, मौजा रुईखैरी हद्दीत राष्ट्रीय महामार्ग क्र. ४४ या मार्गाने ०१ इसम मोपेड क्र. एमएच ४९ बीएल ४३३७ या दुचाकी वाहनाने स्वत: जवळ अमली पदार्थ गांजा बाळगुन रूईखैरी गावात विक्री करीता घेवुन येणार आहे. प्राप्त खबरेची शहानिशा करणेकामी स्थागुशाचे पथकाने अपना पंजाब ढाबा, मौजा रुईखैरी शिवारातील महामार्गावर नाकाबंदी सुरु केली असता दुपारी ०३.३० वाजताचे सुमारास आरोपी कुदरत खान इस्माईल खान, वय ५० वर्ष, रा. हाउस नं. १५९५ बुध्द नगर, सजन किराना दुकान जवळ, पिली स्कुल, आशिनगर, टेका नाका, नागपूर याची दुचाकी होन्डा कंपनीची डेस्टीनी मोपेड क्र. एमएच ४९ बीएल ४३३७ नाकाबंदी दरम्यान तपासण्यात आली असता त्यांचे जवळ २ किलोग्रॅम अंमली पदार्थ गांजा मिळून आला. आरोपी हा आशिनगर, टेका नाका, नागपूर येथील रहीवासी असून ट्रक ड्रायव्हर म्हणुन काम करतो. सदर कार्यवाही दरम्यान आरोपी कुदरत खान याचे जवळील होन्डा मोपेडच्या सिटखालील डिक्कीमध्ये गांजा मिळून आला. आरोपी जवळून अंमली पदार्थ गांजा, १ होन्डा कंपणीचे मोपेड, ०१ मोबाईल संच असा एकुन ८६,०००/— रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर कार्यवाही ही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री विशाल आनंद व अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदीप पखालेयांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे, परिवीक्षाधिन पोलीस उपअधीक्षक श्री राहुल झालटे, सहा. पोलीस निरीक्षक, राजीव कर्मलवार, पोलीस हवालदार दिनेश आधापूरे, मिलींद नांदुरकर, महेश जाधव, नरेंद्र पटले, अरविंद भगत, मयुर ढेकले पोलीस नायक अमृत किनगे, बालाजी साखरे, अजीज दुधकनोज सत्यशील कोठारे चालक पोलीस शिपाई आशुतोष लांजेवार यांनी पार पाडली.



## जबरी चोरी

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत ०४ किमी अंतरावर अंबाळा टर्निंग जवळ येथे दिनांक ०३/०४/२३ चे १४/३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– शुभम वासुदेव मोहनकर, वय २७ वर्ष, रा. वार्ड क्र. ३ काचुरवाही ता. रामटेक जि. नागपुर हा आपल्या होणाऱ्या पत्नीसोबत मोटार सायकलने गावाकडे जाण्याकरीता निघाला असता गडमंदिरचे खाली रोडचे आडीमोळी वळणावर अंबाळा टर्निंगजवळ **अज्ञात आरोपी मोटार सायकल क्र. एमएच ४० –४८२५** वर टिबलसिट तीन इसम मागुन आले व फिर्यादीची गाडी थांबवुन चाकुचा धाक दाखवुन शिवीगाळी करून मारण्याची धमकी देवुन फिर्यादीच्या खिशात हात टाकुन जबरदस्तीने २०००/–रूपये काढले तसेच फिर्यादीच्या होणाऱ्या पत्नीच्या पर्समधील ५०००/–रू जबरदस्तीने हिसकले तसेच हातातील रिअलमी कंपनीचा मोबाईल किंमती अंदाजे ४०००/– रू असा एकुण ११०००/– रूपयाचा मुद्देमाल अज्ञात आरोपींनी जबरदस्तीने हिसकावुन घेवुन गेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीतांविरुध्द कलम ३९२, ५०४, ५०६, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी श्रीकांत लांजेवार मो. नं. ९७६४१९०९५१ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर